नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४५। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. १८ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## अनेकांना मी दिल्लीत जावेसे वाटत असले, तरी मी महाराष्ट्रातच राहणार!

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

**मुंबई(समर्थ गांवकरी)**

अनेक लोकांना मी दिल्लीत जावेसे वाटत असले, तरी मी महाराष्ट्रातच आहे आणि महाराष्ट्राच्या जनतेची प्रामाणिकपणे सेवा करत राहणार आहे, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर नवी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. आपल्या दिल्ली दौऱ्याचे कारण स्पष्ट करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील एकूण प्रशासन, महत्त्वाचे प्रकल्प आणि केंद्र सरकारकडून अपेक्षित असलेली मदत यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन विस्तृत पत्र दिले. महामार्ग, रेल्वे, मेट्रो आणि नदी जोड प्रकल्पांसह विविध टप्प्यांवर असलेल्या विकासकामांना गती देण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

पंतप्रधानांच्या भेटीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. ५४ हजार कोटी रुपयांच्या उत्तन ते विरार या म हत्त्वाकांक्षी कॉरिडॉर प्रकल्पासाठी जपानच्या 'जायका' संस्थेकडे पाठपुरावा करण्याबाबत या वेळी चर्चा झाली. हा प्रकल्प मोठा असल्याने जायकासोबत आणखी एका बहुराष्ट्रीय संस्थेला जोडून या प्रकल्पाचे निधी संकलन करता येईल का, याविषयी केंद्र सरकारने दिलेला सल्ला राज्याने मान्य केला असून, त्यावर काम सुरू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. याशिवाय, केंद्रीय पर्यावरण व वन मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन प्रलंबित पर्यावरणीय परवानग्या त्वरित देण्याची विनंती त्यांनी केली. यादव यांनी तात्काळ मंजुरी देण्याचे आश्वासन दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शेंद्रा-बिडकीन येथे अतिरिक्त ८ हजार एकर जमिनीचे संपादन केले जात असून डीएमआयसी अंतर्गत विकसित या वसाहतीसाठी केंद्र सरकारने निधी द्यावा, अशी मागणी केली आहे. तसेच दिल्ली-



नागपूर कॉरिडॉरवर नागपूरजवळील सावनेर येथे ६ हजार एकर जागेवर औद्योगिक वसाहत उभारली जात आहे. याशिवाय दिघी येथे ६ हजार एकर जमीन संपादित झाली असून केंद्राच्या एकरकमी निधीतून रस्ते व पायाभूत सुविधांच्या कामांची निविदा काढण्यात आली आहे.

## सिंधुदुर्गातील मोबाईल नेटवर्कच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार;

### पालकमंत्री नितेश राणे यांचे जिओच्या अधिकाऱ्यांना निर्देश

**मुंबई(समर्थ गांवकरी)**

मुंबई : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुर्गम भाग आणि पर्यटन स्थळांवर सातत्याने जाणवणाऱ्या मोबाईल नेटवर्क तसेच इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या सम स्यांवर आता कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी याबाबत रिलायन्स जिओच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेऊन जिल्ह्यातील डिजिटल पायाभूत सुविधा तातडीने सक्षम करण्याचे निर्देश दिले.

पालकमंत्री नितेश राणे यांच्या 'सुवर्णगड' या शासकीय निवासस्थानी ही उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील नेटवर्कची सद्यस्थिती, कॉल ड्रॉप्स, इंटरनेटचा मंद वेग आणि भविष्यातील वाढत्या डिजिटल गरजांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सिंधुदुर्गातील ज्या-ज्या भागात नागरिकांना आणि पर्यटकांना नेटवर्कची अडचण भासत आहे, तेथे तातडीने नवीन मोबाईल टॉवर्स उभारण्यात यावेत, अशी मागणी पालकमंत्र्यांनी या वेळी केली.

जिल्ह्याची विशिष्ट भौगोलिक रचना, डोंगरी भाग आणि सागरी किनारपट्टी लक्षात घेऊन नेटवर्क सेवेची क्षमता वाढवण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येक



नागरिकाला आणि दूरवरच्या गावांना दर्जेदार इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळावी, यासाठी आवश्यक त्या सर्व तांत्रिक उपाययोजना करण्याचे निर्दे श नितेश राणे यांनी कंपनी प्रशासनाला दिले. या बैठकीस रिलायन्स जिओचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी सुनील गोसावी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी राजीव अमिदवार उपस्थित होते.

## नोएल टाटा यांनी घेतली अमित शहा आणि पंतप्रधान कार्यालयाच्या अधिकाऱ्याची भेट

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**



एन. चंद्रशेखरन यांनी २०२७ म ध्ये टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून पायउतार होण्याच्या घेतलेल्या निर्णयाच्या आणि सर रतन टाटा ट्रस्टमधील सुरू असलेल्या कायदेशीर अडचणींच्या पार्श्वभूमीवर, टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. टाटा समूहातील संचालक मंडळातील उत्तराधिकार आणि प्रशासकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाली आहे. टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी शनिवारी दुपारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान कार्यालयातील एका प्रमुख अधिकाऱ्याची भेट घेतली, अशी माहिती या घडामोडींची जाण असलेल्या व्यक्तींनी दिली.

सदिच्छा भेट म्हणून मानली जाणारी ही भेट, टाटा समूहातील अंतर्गत अशांततेच्या काळात होत आहे. ट्रस्ट्समधील अंतर्गत संघर्ष आणि त्यांच्या आतील व बाहेरील लोकांकडून होत असलेल्या प्रशासकीय त्रुटींच्या आरोपांशी हा समूह झुंज देत आहे.

## चितळवेढे येथे एसटी महामंडळाच्या एनसीएमसी कार्डसाठी विशेष शिबिर!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे व सौ. पुष्पाताई लहामटे यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे आणि युवक तालुका अध्यक्ष अक्षय आभाळे यांच्या माध्यमातून एसटी महामंडळाचे एनसीएमसी कार्ड काढण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विठ्ठल-रुख्मिणी मंदिर, चितळवेढे येथे होणार आहे. एनसीएमसी कार्डच्या माध्यमातून एसटी प्रवासातील तिकीट व्यवहार अधिक सुलभ होण्यास मदत होणार असून महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच नियमित प्रवाशांना याचा लाभ घेता येणार आहे. कार्ड काढण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक आणि १९९ रुपये आवश्यक शुल्क घेऊन उपस्थित राहावे. चितळवेढे व परिसरातील जास्तीत जास्त महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नागरिकांनी या विशेष शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी युवक काँग्रेस, अकोले तालुका, शाखा चितळवेढे व दैनिक समर्थ गांवकरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या हरित अर्थव्यवस्थेला चालना

**मुंबई(समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याच्या दिशेने हरित आणि शाश्वत विकासाला मोठी गती मिळत आहे.या वर्षाच्या सुरुवातीला पार पडलेल्या इंडिया स्टेट क्लायमेट इन्व्हेस्टमेंट फोरम (आयएससीआयएफ) २०२६ मध्ये राज्यातील स्वच्छ ऊर्जा, हरित उद्योग, कार्बन रिमूव्हल, स्वच्छ इंधन आणि कृषी क्षेत्राशी संबंधित प्रकल्पांसाठी अब्जावधी रुपयांच्या गुंतवणूक घोषणा करण्यात आल्या. या गुंतवणुकीमुळे राज्यातील हरित पायाभूत सुविधा, स्वच्छ ऊर्जा उत्पादन, शाश्वत शेती आणि रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळणार आहे.

महाप्रीत आणि सुगम-सीएसएस यांच्या भागीदारीतून, महाराष्ट्रातील फळे आणि भाजीपाल्याच्या प्रमुख उत्पादन क्षेत्रांमध्ये




(क्लस्टर्समध्ये) १०० सौरऊर्जेवर चालणारी सूक्ष्म शीतगृहे उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, 'आयकार्ट' आणि 'आयकार्ट राईज फाउंडेशन' यांच्या माध्यमातून, राज्यातील १० हून अधिक क्षेत्रांमध्ये शेतकरी उत्पादक संस्था आणि शेतकरी गटांसाठी आधीच उभारण्यात आलेल्या ५० सूक्ष्म शीतगृहांना बाजारपेठेशी जोडण्यासाठी सहाय्य दिले जात आहे. यामुळे फळे आणि भाजीपाल्याचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी होण्यास आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात, या शिखर परिषदेच्या माध्यमातून कृषी सौर ऊर्जा आणि वितरित सौर प्रकल्पांमध्ये सुमारे ५० दशलक्ष अमेरिकी डॉलरपर्यंतच्या गुंतवणुकीबाबत स्वारस्य निर्माण झाले आहे. महावितरणच्या फीडर सोलरायझेशन कार्यक्रमांतर्गत तसेच इतर तत्सम प्रकल्पांसाठी महाराष्ट्रातील विकासकांसोबत पुढील कार्यवाही आधीच सुरू करण्यात आली आहे. राज्यातील शहरांमधील मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीच्या विद्युतीकरणासाठी, विशेष हरित वित्तपुरवठा संस्था सीकेर्स फायनान्सने एक अब्ज रुपयांपर्यंत वित्तपुरवठा करण्यास स्वारस्य दर्शविले आहे. हा वित्तपुरवठा व्यावसायिक इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर्स आणि फोर-व्हीलर्ससाठी उपलब्ध होणार असून, राज्यातील स्वच्छ वाहतूक व्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल.

## शेठ टी. जे. हायस्कूलच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनाची भव्य उत्साहात उजळणी

दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी शेठ टी. जे. एज्युकेशन सोसायटी संचालित शेठ त्रिभुवनदास जमनादास हायस्कूल, शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला कनिष्ठ वाणिज्य महाविद्यालय, शेठ जयंतीलाल त्रिभुवनदास ठाणावाला कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, तसेच शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला इंग्रजी माध्यम शाळा आणि कनिष्ठ वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या स्वातंत्र्यदिनाची भव्य उत्साहात उजळणी करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई खिम जीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या शुभहस्ते ध्वजवंदनाने करण्यात आली. ध्वजवंदनानंतर राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले. यामुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीच्या रंगात रंगून गेले.

संस्थेचे सचिव श्री. नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, श्री जसुभाई डाभी,श्री रामजीभाई पटेल,श्री मयुर कापडिया, श्री राजेंद्र पुराणि, महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप पाटील,शेठ टी. जे. हायस्कूल तसेच एन. के. टी. कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती मनीषाबेन ठक्कर, शेठ एन. के. टी. इंग्लिश मिडियम स्कूलच्या प्राचार्या श्रीमती लिडिया सालियन, संस्थेचे विश्वस्त, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते

संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई खिम जीभाई ठक्कर यांनी आपल्या संबोधनात सांगितले की, भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, बलिदान आणि संघर्षाचे अमूल्य फलित आहे. या स्वातंत्र्याचे रक्षण करणे तसेच देशाची एकता, अखंडता आणि प्रगती यासाठी आपले योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार, राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यनिष्ठा हे गुण आत्मसात करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, आजची युवा पिढी ही देशाचे भविष्य आहे. शिक्षित, सुसंस्कारी आणि जबाबदार युवकच सशक्त व विकसित भारताच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. विद्यार्थ्यांनी अभ्यासात प्रगती करण्याबरोबरच राष्ट्राच्या विकासातही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी तसेच उपस्थित मान्यवरांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान संपूर्ण परिसरात




राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.



# संवादातून सुविधेकडे, खुल्या मंचावर कोपरगावकरांनी मांडले विकासाचे व्हिजन

## प्रथमच नगरपरिषद कार्यक्षेत्रात अशा खुला चर्चेचा अनोखा उपक्रम

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव शहरासह मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी व्हिजन कोपरगाव मंचच्या पुढाकाराने 'संवादातून सुविधेकडे' या विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन रविवारी १६ ऑगस्ट रोजी कोपरगाव शहरातील कृष्णाई बँक्वेट हॉल येथे करण्यात आले होते. शहरातील सुशिक्षित वर्ग, उद्योजक, डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि व्यापाऱ्यांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कोपरगावच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. विजन कोपरगावच्या या संवाद कार्यक्रमात विधान परिषदेचे आमदार विवेक कोल्हे यांचा सत्कार करण्यात आला तसेच या कार्यक्रमाला कोपरगावचे नगराध्यक्ष पराग यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पहिल्या सत्रात बाजारपेठेवर चर्चा झाली त्यात अशोक कोठारी संजय बंब, संजय भन्साळी, सुधीर डागा,नितीन भुसारे,दीपक विसपुते यांनी तज्ञ म्हणून आपले विचार मांडले. दुसऱ्या सत्रात पायाभूत सुविधांवर प्रकाश टाकण्यात आला या चर्चेसाठी डॉ.डी.एस. मुळे,राजेश ठोळे, डॉ.राजेंद्र श्रीमाळी,प्रसाद नाईक,संतोष भट्टड, प्रा.रियाज शेख,प्रा. वृंदा कोऱ्हाळकर यांनी संवाद साधला.

या बैठकीत उपस्थित मान्यवरांनी शहरातील दैनंदिन अडचणी आणि बाजारपेठेच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली, बाजारपेठेतील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी पार्किंग व्यवस्थेचे नियोजन करणे, मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण, खड्डे मुक्त रस्ते, मोकाट जनावरांचा प्रश्न मार्गी लावणे, रस्ते बांधकाम करताना प्रॉपर ट्रीटमेंटने रस्ते बनवावे, विकास कामे करताना चांगल्या दर्जाचे करावे, कोपरगावात बाजारपेठ हलवण्यासाठी नवनवीन उद्योगांना चालना द्यावी, युवा व्यापाऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करावे, पर्यटनासाठी सुविधा उपलब्ध कराव्यात अशा अनेक गोष्टींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा, ड्रेनेज लाईनची दुरुस्ती आणि स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी डॉक्टर्स व अभियंत्यांनी केली.स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवीन व्यवसायांना चालना देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्याचे आवाहन व्यापाऱ्यांनी केले.

संवाद कार्यक्रमादरम्यान बोलताना आमदार विवेक कोल्हे म्हणाले, कोपरगाव शहराला सुसज्ज आणि आधुनिक बनवण्यासाठी प्रत्येक घटकाचे योगदान महत्त्वाचे आहे. नागरिकांनी मांडलेले प्रश्न केवळ कागदावर न राहता, त्यावर टप्प्याटप्प्याने ठोस उपाययोजना केल्या जातील यासाठी ही चर्चा महत्वाची ठरणार आहे. तसेच चार महिन्यानंतर डिसेंबर महिन्यात पुन्हा एकदा अशा पद्धतीने संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आवाहन देखील विवेक कोल्हे यांनी आयोजकांना केले.



नगराध्यक्ष पराग संधान यांनीही नगरपरिषदेच्या वतीने शहरातील सर्व प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. काही काळ रस्त्यांची कामे विलंब होतील कारण भूमिगत गटारीची कामे सुरू आहे त्यामुळे पुन्हा रस्ता खोदावा लागू नये यासाठी उशीर होतो आहे. मोकाट जनावरांसाठी नगरपरिषद गोशाळा उभारत असून हा प्रश्न देखील आता सुटण्याच्या उंबरठ्यावर आला आहे.या उपक्रमामुळे नागरिक आणि लोकप्रतिनिधींमधील दुवा अधिक घट्ट झाला असून, कोपरगावच्या विकासाला नवी दिशा मिळेल असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# कामगारांच्या विविध मागण्यांसाठी भारतीय मजदूर संघाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

कामगार व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघ, अहिल्यानगर जिल्हा यांच्या वतीने (मागनी दिवस) निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. कामगारांच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

भारतीय मजदूर संघाच्या केंद्रीय कार्यसमितीच्या बैठकीत देशभरातील कामगार व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित प्रश्नांसाठी १७ ऑगस्ट रोजी (मांगनी दिवस) आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातही विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले. यामध्ये EPS-95 अंतर्गत किमान पेन्शन १ हजार रुपयांवरून ७ हजार ५०० रुपये प्रतिमाह करावी व त्याला तऊ सोबत जोडावे, तसेच आयुष्मान भारत योजनेशी पेन्शनधारकांना जोडावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. EPF, ESIC व बोनसच्या गणनेसाठी वेतनाची कमाल मर्यादा दुप्पट करावी, जुनी पेन्शन योजना (OPS) पुन्हा लागू करावी, तसेच ग्रॅच्युइटीची गणना १५ दिवसांऐवजी ३० दिवसांच्या वेतनानुसार करावी, अशी मागणीही करण्यात आली.

सर्व कर्मचाऱ्यांना, कंत्राटी कर्मचाऱ्यांसह, 'समान कामासाठी समान वेतन' लागू करावे, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतीनुसार किमान वेतनात वाढ करावी आणि अंगणवाडी, आशा, मिड-डे-मील, NHM[2] आदी योजना कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच बँकांमध्ये आठवड्यातून पाच दिवस कामकाजाची व्यवस्था लागू करावी, कामगारविरोधी तरतुदी दूर करण्यासाठी लेबर कोडमध्ये योग्य दुरुस्ती करावी, हेवी इंजिनिअरिंग कंपनी रांची तसेच आठ राज्यांतील २३ नॅशनल टेक्सटाईल मिलमधील कामगार व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी मागणी करण्यात आली.

भारतीय जीवन विमा निगम (LIC) मधील पदव्युत्तर विकास अधिकाऱ्यांना नोकरीची सुरक्षा द्यावी, कोणत्याही प्रकारची बडतर्फी किंवा वेतनकपात करू नये, तसेच कनिष्ठ व वरिष्ठ सहाय्यकांच्या वेतनातील विसंगती दूर करून दोन्ही पदांचे एकत्रीकरण करावे, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे. कामगारांच्या सामाजिक सुरक्षा, आर्थिक न्याय, योग्य वेतन, रोजगाराची सुरक्षितता आणि सन्मानजनक कामाच्या हक्कांसाठी शासनाने या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी भारतीय मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री किरण मिलगी, प्रदेश सचिव ज्ञानेश्वर जाधव, जिल्हाध्यक्ष सुजीत उदरभरे, जिल्हा सचिव कृष्णा साठे, प्रदीप भाटे, सुनील मुंगसे, संतोष जेजुरकर, राधेश्याम कुलकर्णी, सचिन पाटील, अमोल आभाळे, प्रकाश नहार, माधुरी देवढे, राहुल नेमाने, आदिनाथ पठाडे, माणिकराव सोनटक्के, आशिष डहाने, अतिश लांडगे, सतीश दिघे, सोमनाथ सावंत, गणेश कुंभारे, राजेंद्र क्षीरसागर, अजित आरोटे आदीसह विविध क्षेत्रातील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निझरनेश्वर येथे मा.आ. डॉ. सुधीर तांबे व दुर्गाताई तांबे यांच्या हस्ते पूजा

### लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून निसरनेश्वर परिसराचा विकास : मा. आमदार डॉ. तांबे

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**



भारतीय संस्कृतीमध्ये श्रावण महिना हा अत्यंत पवित्र मानला जातो. सणासुदीचा हा काळ असून अध्यात्म आणि निसर्ग यातून माणसाला आनंद मिळतो. संगमनेर तालुक्यातील निसरनेश्वर बाळेश्वर रामेश्वर खांडेश्वर यांसह विविध देवस्थानांसाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून सातत्याने निधी दिला असून त्यांच्या प्रयत्नातून निझरनेश्वर परिसर सुंदर झाले असल्याचे प्रतिपादन मा. आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे.

कोकणगाव येथील निझरनेश्वर येथे पहिल्या श्रावणी सोमवार निमित्त माजी आमदार डॉ सुधीर तांबे व सौ दुर्गाताई तांबे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. यावेळी अध्यक्ष दिलीप जोंधळे, गोपीनाथ पानसरे, सोमनाथ जोंधळे, शिवाजी जोंधळे, बबन पवार ,गंगाधर वायकर, दगडू जोंधळे, रामनाथ शिंगोटे, निवृत्ती पानसरे यांच्यासह विविध ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये विकासाच्या योजना राबविण्यात आले आहे याचबरोबर संगमनेर तालुक्यामध्ये असलेले निझरनेश्वर, रामेश्वर, बाळेश्वर, अमृतेश्वर, दुधेश्वर, खांडगाव येथील खंडेश्वर अशा विविध महादेवांच्या मंदिरांचे सुशोभीकरण करण्यात आले आहे याकरता त्यांनी सातत्याने निधी दिला आहे.

कोकणगाव व निझरनेश्वर परिसरासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने निधी दिला असून त्या माध्यमातून हे धार्मिक स्थळ अनेक भाविकांचे श्रद्धास्थान ठरले आहे. श्रावण महिना हा आनंदाचा व सणासुदीचा काळ असतो. या महिन्यांमध्ये मोठ्या संख्येने भाविक कोकणगावला येत असून सर्व भाविकांचे अद्यावत सुविधा व्हावी याकरता त्यांनी चांगल्या सुविधा निर्माण करून दिले आहेत. यापुढील काळातही या परिसराच्या विकासाकरता आमदार सत्यजित तांबे यांच्या माध्यमातून काम केले जाईल असे ते म्हणाले.

# मोकाट जनावरांचा होणार बंदोबस्त; कोपरगाव नगरपरिषदेचा गो शाळा उभारणीचा सकारात्मक निर्णय

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव नगरपरिषद कार्यक्षेत्रात मोकाट जनावरांमुळे नागरिकांना होणारा त्रास, वाहतुकीतील अडथळे तसेच अपघातांचा धोका लक्षात घेऊन कोपरगाव नगरपरिषदेने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. गोप्रेमी नागरिकांच्या सहकार्याने नगरपरिषदेच्या माध्यमातून स्वतःची गोशाळा उभारण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला असून, या गोशाळेच्या कामाला दि. १८ ऑगस्ट २०२६ पासून प्रत्यक्ष सुरुवात होत आहे. नगरपरिषद प्रशासनाने यापूर्वी शहरातील मोकाट जनावरांना पकडून त्यांची विविध गोशाळांमध्ये व्यवस्था केली होती. मात्र, अनेक गोशाळांमध्ये जागा उपलब्ध नसल्याने आता पकडलेली जनावरे स्वीकारण्यास नकार दिला जात आहे. दुसरीकडे नगरपरिषदेने मोकाट जनावरांच्या व्यवस्थापनासाठी दोन वेळा निविदा प्रक्रिया राबवूनही त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या समस्येवर कायमस्वरूपी आणि स्थानिक पातळीवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी नगरपरिषदेने स्वतःची गोशाळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या कामाची प्राथमिक सुरुवात जागेची लेव्हलिंग, साफसफाई व आवश्यक पूर्वतयारीच्या कामांपासून करण्यात येणार आहे. नगराध्यक्ष परागजी संधान यांच्या उपस्थितीत तसेच सर्व सभापती, नगरसेवक, पदाधिकारी आणि अधिकारी यांच्या उपस्थितीत या कामाला प्रत्यक्ष प्रारंभ होणार आहे.

# नागपंचमी कवितेतून माहेरच्या ओढीचे भावनिक चित्रण

वैशाख महिन्यात लेकीचे लग्न होते, लेक सासरी जाते. लेकीला माहेरी मूळ लावण्यासाठी काहीतरी निमित्त लागते. मात्र, अक्षय तृतीयेनंतर मराठी सणांची सुरुवात होते. बरेच दिवस निघून जातात. मराठी सणांपैकी पहिला येणारा सण म्हणजे 'नागपंचमी'.

माय आपल्या पतीला लेकीला नागपंचमीच्या सणाला माहेरी आणण्यासाठी सांगते. लेक माहेरी आल्यावर, तिथे तिचे कसे कोडकौतुक करायचे, याचे संपूर्ण वर्णन माझ्या या कवितेतून करण्याचा प्रयत्न केला आहे. या कवितेचे नाव 'नागपंचमी' आहे.

**नागपंचमी**

नागपंचमीचा सन, माय करीते कालवा
धाडा मुऱ्हाळी लवकर, माझ्या ताईला बोलवा ।।धृ।।

झालं लगीन वैशाखात, तशी लेक सासराला,
आस भेटीची मनाला, तिची मूर्ती पहाण्याला,
सणा येते ताई माझी, दारी तोरण सजवा ।।१।।

लग्नानंतर नाही सण, तिला मुळ लावायला,
मन आतुर माझं झालं, लेक जवळ घ्यायला,
सय येई पुन्हा पुन्हा, माझ्या लेकीला भेटवा ।।२।।

दिस गेले, महिने गेले, मन कासावीस झाले,
लेक आठवताच क्षणी, डोळे माझे पाऱ्हावले,
तिला पाठवूनी सासरी, जपते आठवणींचा ठेवा ।।३।।

तिला झोक्यात बसवा, हौस तिची हो पुरवा,
माझ्या बाळाला नटवा, गाणी झुल्याची सुनवा,
हाती पंचारती घेऊन, तिला वारुळा पाठवा ।।४।।

सासरी कितीही सुख, ओढ माहेराची न्यारी,
कुस आईची ही भारी, तिथे आनंद भरजरी श्रश्र ,
तिला घालू पाळण्यात, पुन्हा पाळणा झुलवा ।।५।।

लेक माहेरी येनार, मन म्हणं वारंवार,
ये ना बाळा तु लवकर, तुझ्यासाठि उघडी दारं,
तिच्या येण्याने घरभर , पुन्हा आनंद फुलवा ।।६।।

धाडा मुऱ्हाळी लवकर, माझ्या लेकीला बोलवा.

कवी माजी प्राचार्य आर के राहणे सर, वाघापूर तालुका संगमनेर
लेखन - १५ ऑगस्ट २०२६



# अभिजीत दीपके यांनी रिपब्लिकन पक्षात यावे : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## पेपरफुटीविरोधातील लढ्याचे केले कौतुक

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

अभिजीत दीपके यांच्या 'कॉकरोच जनता पार्टी'ने नीट परीक्षेतील पेपरफुटीचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर जनतेपर्यंत पोहोचवला. पेपरफुटीविरोधातील या लढ्याचा परिणाम घराघरापर्यंत पोहोचला, असे आठवले यांनी सांगितले. त्यामुळे दीपके यांनी रिपब्लिकन पक्षात यावे, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

रिपब्लिकन पक्ष हा केवळ एका समाजापुरता मर्यादित पक्ष नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांवर आधारित पक्ष असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले. सर्व जाती-धर्माच्या लोकांना पक्षात आणले पाहिजे. केवळ दलितांच्या मतांवर निवडणूक जिंकणे शक्य नाही. त्यामुळे नॉन-दलित समाजालाही सोबत घेतले पाहिजे, अशी बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती, असे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. गरीब, शेतकरी, युवक, महिला, बेरोजगार तसेच विविध जाती-धर्मातील नागरिकांनी रिपब्लिकन पक्षाशी जोडले गेले पाहिजे, अशी पक्षाची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेमागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची माहिती देताना ना. रामदास आठवले म्हणाले की, काँग्रेसच्या विरोधात एक मजबूत राजकीय पर्याय असावा, अशी बाबासाहेबांची इच्छा होती. देशात सत्ताधारी पक्ष आणि त्याला प्रभावीपणे विरोध करणारा एक पक्ष अशी राजकीय व्यवस्था असावी, अशी त्यांची कल्पना होती. त्यासाठी त्यांनी विविध नेत्यांशी पत्रव्यवहारही केला होता. मात्र, त्यांच्या हयातीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना होऊ शकली नाही, असे ना. रामदास आठवले यांनी सांगितले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) आगामी काळात चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये निवडक जागा लढवणार असल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब आणि मणिपूर या चार राज्यांमध्ये पक्षाचे संघटन असून, या राज्यांमध्ये आरपीआय काही जागा लढवणार आहे. उर्वरित जागांवर भाजपला पाठिंबा देण्याची पक्षाची भूमिका असेल, असे त्यांनी सांगितले. या चारही राज्यांमध्ये एनडीएला सत्तेत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही ना. रामदास आठवले यांनी स्पष्ट केले. रिपब्लिकन पक्षाला सध्या नागालँड आणि मणिपूरमध्ये मान्यता असल्याचे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. आणखी दोन राज्यांमध्ये पक्षाला मान्यता मिळाल्यास राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळवण्याच्या दिशेने मोठी प्रगती होईल, असा दावा त्यांनी केला. महाराष्ट्रातही पक्षाला पुन्हा राजकीय मान्यता मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात दोन-तीन जागा लढवण्याची मागणी पक्ष करणार असून, त्यापैकी दोन जागा जिंकल्या तर पक्षाच्या राजकीय स्थितीला मोठे बळ मिळेल, असे ना. रामदास आठवले म्हणाले. अभिजीत दीपके यांच्या राजकीय वाटचालीबाबत बोलताना ना. रामदास आठवले यांनी त्यांना थेट पक्षप्रवेशाची ऑफर दिली. दीपके हे यापूर्वी विविध सामाजिक आणि राजकीय आंदोलनांशी जोडले गेले होते.

अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या काळातही ते सक्रिय होते, असे आठवले यांनी नमूद केले. अरविंद केजरीवाल यांच्या टीमसोबतही दीपके यांनी काम केले असल्याचा उल्लेख त्यांनी केला. मात्र, दीपके यांनी स्वतःचा पक्ष स्थापन केल्यानंतर नीट पेपरफुटीचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर जनतेपर्यंत पोहोचल्याचे आठवले यांनी मान्य केले. रोज एखादा पक्ष काढण्यात उपयोग नाही. पण अभिजीत दीपके यांनी पक्ष काढल्यामुळे नीट परीक्षेतील पेपरफुटीचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर घराघरात पोहोचला. पेपर लीक होणे अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे आता त्यांनी रिपब्लिकन पक्षात आले पाहिजे, असे ना. रामदास आठवले म्हणाले. ना. रामदास आठवले यांनी दलित तरुणांना सरकारी योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे उद्योग सुरू करण्याचे आवाहन केले. सगळ्यांनी नोकरी शोधण्यापेक्षा स्वतःचे उद्योग उभे केले पाहिजेत. स्वतःच्या पायावर उभे राहून इतर २०, ५०, १०० किंवा २०० लोकांना रोजगार कसा देता येईल, याचा विचार केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांमधून उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध असल्याचा दावा त्यांनी केला. मत्स्य व्यवसायासह विविध क्षेत्रांतील योजनांचा लाभ घेऊन तरुणांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले.



कोकणातील तरुणांना कोकणातच रोजगार मिळाला पाहिजे. कोकणातील तरुणांना रोजगारासाठी मुंबईकडे स्थलांतर करावे लागू नये, यासाठी कोकणात कोकणातील तरुणांना रोजगारासाठी मुंबईकडे स्थलांतर करावे लागू नये, यासाठी कोकणात छोटे-मोठे उद्योग उभे राहण्याची गरज असल्याचे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. कोकण हा निसर्गसौंदर्याने समृद्ध प्रदेश असून पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने अद्याप विकसित न झालेल्या ठिकाणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता
कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी, ता.कर्जत, जि. अहिल्यानगर पिन ४१४४०२
ई मेल पत्ता- kdcdkolwadi.engineer83@gmail.com

**'ई' निविदा सूचना क्र.०६/२०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर, पिन कोड - ४१४४०२ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये | ठेकेदार पात्रता |
|---|---|---|---|---|
| १) | को.प. बंधारा गिरवली, ता. जामखेड ची दुरुस्ती करणे. | अहिल्यानगर | २११६५१९ /- | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत अहिल्यानगर जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंते |
| २) | को.प. बंधारा सांगवी, ता. जामखेड ची दुरुस्ती करणे. | अहिल्यानगर | २११५१६६ /- | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत अहिल्यानगर जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंते |

निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १८/८/२०२६ ते दि.२५/०८/२०२६
निविदा उघडण्याचा दिनांक - २७/०८/२०२६
जा.क्र. कुविबांवि / लेशा-२/३०८९/ सन - २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी, दिनांक १४/८/२०२६

**कार्यकारी अभियंता**
**कुकडी वितरण बांधकाम विभाग**
**कोळवडी, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर**

**जिमाका/नगर/जाहि/९०/२०२६**

# पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान आणि अनुलोम संस्थेचा उपक्रम

## निसर्गसृष्टी गोशाळेत भाजपचे जेष्ठ नेते वसंत लोढा यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

वाढदिवस साजरा करताना फटाके, डीजे आणि फ्लेक्सचा खर्च टाळून पर्यावरणासाठी वृक्ष लावण्याचा संदेश देणारा आदर्श उपक्रम पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान आणि अनुलोम संस्थेने राबवला आहे.भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांच्या वाढदिवसानिमित्त इसळक येथील निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे विश्वस्त अनुराग धूत,सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, निसर्गसृष्टी गोशाळेचे अध्यक्ष डॉ.विलास जाधव, सचिव गौतम कराळे, खजिनदार गजेंद्र सोनवणे, उपाध्यक्ष विश्वास बेरड,निलेश चिपाडे,अरुण धामणे, गवळी,सोनू शेख,मराठा पतसंस्थेचे उपाध्यक्ष उदय अनभुले,सुरेंद्र सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

वाढदिवस झाडांसोबत साजरा करा – अनुराग धूत

यावेळी उद्योजक अनुराग धूत म्हणाले, झाडे लावा, झाडे जगवा ही संस्कृती प्रत्येकाने पुढे न्यावी. प्रत्येकाने आपला वाढदिवस किमान एक झाड लावून साजरा करावा. फटाके आणि फ्लेक्सवर होणारा खर्च निसर्गासाठी वापरावा.

**■ ५५६ वृक्षांचे उद्दिष्ट**
**■ वाढदिवस झाडांसोबत साजरा करा - अनुराग धूत**

भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा दरवर्षी सामाजिक कार्यातून आपला वाढदिवस साजरा करतात, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत पर्यावरण प्रेम, देशसेवा आणि गोसेवा यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो.

५५६ वृक्षांचे संकल्प

पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी अनुराग धूत यांच्या हस्ते निसर्गसृष्टी गोपालन संस्थेच्या परिसरात १० देववृक्षांचे रोपण करण्यात आले.

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा म्हणाले, महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व अनुलोम संस्थेच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी ५५६ वृक्ष लावण्यात येणार आहेत. या पर्यावरणपूरक देववृक्षांमुळे परिसरात सकारात्मक आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल.

गोसेवा आणि पर्यावरणाचा संगम



सुरज अग्रवाल – कार्याध्यक्ष, पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान – गोसेवा ही ईश्वर सेवा आहे. प्रत्येकाने गोसेवेच्या कार्यात हातभार लावावा.

डॉ. विलास जाधव – अध्यक्ष, निसर्गसृष्टी गोपालन संस्था – वसंत लोढा यांचा वाढदिवस दरवर्षी सामाजिक आणि धार्मिक कार्याने साजरा होतो. वृक्षारोपण, पर्यावरण आणि गोसेवा या क्षेत्रात ते नेहमी अग्रेसर असतात. आमच्या संस्थेत कत्तलखान्यातून वाचविलेल्या गाईंसह मोठ्या प्रमाणात देशी गाईंचे संगोपन केले जाते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौतम कराळे यांनी केले. आभार गजेंद्र सोनवणे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सोबलेवाडी शाळेत उत्साहात स्वातंत्र्यदिन; वृक्षारोपणासह विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप



पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील सोबलेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने सामाजिक कार्यकर्त्या सुनीता सोबले यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना क्रीडा उपक्रमांसाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात कृष्णा सोबले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सुनीता सोबले यांच्या हस्ते शाळेच्या आवारात वड तसेच विविध देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगताना, प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक झाड लावून ते जगवावे, असे आवाहन सुनीता सोबले यांनी केले.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाविषयक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी सुनीताताई सोबले यांच्या हस्ते स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप करण्यात आले.

### पाथर्डी शहरात 'वर्षावास' निमित्त 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथाचे वाचन सुरू



पाथर्डी (समर्थ गांवकरी)

आषाढ पौर्णिमेपासून अश्विन पौर्णिमेपर्यंत बौद्ध परंपरेत 'वर्षावास' हा काळ महत्त्वाचा मानला जातो. त्यानिमित्त दि. २९ जुलै २०२६ ते दि. २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पाथर्डी शहरात भारतीय बौद्ध महासभा, पाथर्डी तालुका शाखेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे नियमित वाचन सुरू करण्यात आले आहे.

वर्षावासाच्या काळात धम्माचे अध्ययन, चिंतन आणि आचरण यांना विशेष महत्त्व दिले जाते. या उपक्रमाच्या माध्यमातून भगवान बुद्धांचा धम्म, त्यांची शिकवण तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले धम्मविचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पाथर्डी शहरातील या उपक्रमाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विविध सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर तसेच बौद्ध उपाआणि नियमि तपणेआणिग्रंथाचे वाचन, धम्मचर्चा आणि मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उपासक–उपासिकांनी परिश्रम घेतले. वर्षावासाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेल्या या ज्ञानोपासनेमुळे पाथर्डी परिसरात धम्मविचारांचा प्रसार होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

### माजी विद्यार्थ्यांच्या योगदानातून शैक्षणिक उठाव

#### वसंतदादा पाटील विद्यालयाचा स्तुत्य उपक्रम



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

पिंपरी कोलंदर येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना केली असून, विद्यालयाला भरीव अर्थसहाय्य करण्याचा संकल्प केला आहे. मुख्याध्यापक नवनाथ पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, त्याला माजी विद्यार्थी व ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांना हातभार लावत ऋषिकेश बोबडे यांनी विद्यालयास १४ इंची स्क्रीन भेट दिली. तसेच गावचे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रवीण भागचंद्र ओहळ यांनी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी दहा खुर्च्या विद्यालयाला भेट दिल्या. ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच गणेश बोबडे यांनी विद्यालयाच्या विकासासाठी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून ग्रामपंचायतीच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आवाहन केले. विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि ग्रामपंचायतीने एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. मुख्याध्यापक नवनाथ पवार यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने विद्यालय सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे गौरवोद्गार यावेळी ग्रामस्थांनी काढले.

## रयतमध्ये ५५ वर्षांनी भरली ज्येष्ठांची शाळा; माजी सभापती अरुणराव पाचपुते यांचा पुढाकार

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)




वय झाले म्हणून काय झाले, मन तरुण आहे ना! या भावनेने वयाच्या ७४व्या वर्षी तब्बल ५५ वर्षांनंतर सन १९७१च्या इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थी–विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा शाळा भरवली. काष्टी येथील रयत शिक्षण संस्थेच्या विद्यालयात झालेल्या या स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या विद्यालयातील सन १९७१च्या दहावीच्या माजी विद्यार्थी–विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा १६ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला. तालुक्याचे माजी सभापती अरुणराव पाचपुते यांनी आपल्या सहकारी मित्रांच्या सहकार्याने या मेळाव्याचे आयोजन केले.

वयाच्या ७४व्या वर्षी अनेक वर्षांनी एकत्र आलेल्या मित्र–मैत्रिणींना सुरुवातीला एकमेकांना ओळखणेही कठीण झाले. वयामुळे प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल पाहून हास्याचे फवारे उडाले. त्यानंतर सुरू झालेल्या 'ओळख परेड'मध्ये नाव सांगितल्यानंतर अरे, हा तोच! असे म्हणत जुन्या आठवणी जाग्या झाल्या. प्रत्येकाने आपल्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचा प्रवास एकमेकांशी मनमोकळेपणाने शेअर केला.

काहींची मुले–मुली उच्च पदावर अधिकारी आहेत, तर काही जण उद्योजक, व्यावसायिक आणि व्यापारी म्हणून कार्यरत आहेत. पूर्वी कमी शिक्षणातही नोकरीच्या संधी उपलब्ध होत असल्याने अनेक जण नोकरीतून सेवानिवृत्त झाले असून सुखाने जीवन जगत आहेत.

## श्री क्षेत्र कोतुळेश्वर महादेव देवस्थानच्या विकास कामांना उपविभागीय अधिकारी अरुण उंडे भेट

कोतुळ (समर्थ गांवकरी)




संगमनेर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांनी कोतुळ (ता अकोले) येथील श्री क्षेत्र कोतुळेश्वर महादेव देवस्थान ला भेट देत देवस्थान परिसरातील विकास कामांची पाहणी केली यांनी आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकास कामांच्या बाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी श्री कोतुळेश्वर वारकरी शिक्षण संस्थेच्या कामाजकाजाचा आढावा घेतला यावेळी देवस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार केला याप्रसंगी त्यांनी वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आगामी काळात या शिक्षणाची गरज आहे.

अध्यायत्मा ला जोडलेली ही शेवटची पिढी आहे वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी यापुढील काळात नव्या पिढीला अध्यात्माला जोडण्याचे काम करावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

निसर्गरम्य परिसरात असणाऱ्या श्रीक्षेत्र कोतुळेश्वर मंदिर परिसरात परिसरात सुरु असलेल्या मंगल कार्यालय व भक्तनिवास कामाची पाहणी केली आणि वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांमध्ये ते काही काळ रमले.

## मागचं सगळं विसरा, पुढे चला मी आता साडेतीन लाख जनतेचा प्रतिनिधी म्हणून काम करतोय : आमदार काशिनाथ दाते सर



पारनेर (समर्थ गांवकरी)

सोमवार दि. १७ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर वडझिरे येथे विविध विकासकामांच्या लोकार्पण व जलपूजन आमदार काशिनाथ दाते सर यांचे शुभहस्ते संपन्न झाले. राजकारणापेक्षा विकासाला प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. मागचं सगळं विसरा, पुढे चला. मी आता केवळ एका गावाचा, एका गटाचा किंवा एखाद्या विचाराच्या लोकांचा प्रतिनिधी नाही; मी पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील साडेतीन लाख जनतेचा प्रतिनिधी म्हणून काम करतोय, असे सांगत त्यांनी सर्वांना विकासाच्या प्रवाहात सोबत घेऊन जाण्याची भूमिका मांडली.

गेल्या काळातील मतभेद, राजकीय संघर्ष किंवा आरोप–प्रत्यारोप यामध्ये अडकून न पडता आगामी काळात मतदारसंघाच्या विकासासाठी एकत्रितपणे पुढे जाण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. माझ्याकडून कोणत्याही गावाबाबत, कोणत्याही व्यक्तीबाबत किंवा कोणत्याही घटकाबाबत भेदभाव होणार नाही. ज्यांनी मला मतदान केले त्यांच्यासाठी तर काम करायचेच आहे; पण ज्यांनी केले नाही, त्यांच्यासाठीही त्याच ताकदीने काम करणे ही माझी जबाबदारी आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य विश्वनाथ दादा कोरडे, पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी अध्यक्ष प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादीचे अहिल्यानगर उपाध्यक्ष आर एस कापसे सर, रवींद्र गाजरे, राजू एरंडे, विवेक मोरे, तंटामुक्ती अध्यक्ष शंकर चौधरी, राज केटर्सचे राजकुमार मोरे, सोनाबाई चौधरी विमल चौधरी रोहिणी गंधाक्ते, गोरख चौधरी, शिवाजी गंधाक्ते, ललित गंधाक्ते, लहू शेठ चौधरी, संभाजी मोरे, माजी चेअरमन किसन गंधाक्ते, शुभम निघुट, सुभाष निघुट, सोपान करकंडे, खंडू चौधरी, रामा चौधरी, कॉन्ट्रॅक्टर तेजस पाडळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

वडझिरे येथे तळे वस्ती ते शिवडोह रस्त्यासाठी १० लाख रुपये, गोसावी बाबा सभामंडपासाठी १० लाख रुपये तसेच चौधरी वस्तीवरील २५ लाख रुपये खर्चाच्या बंधाऱ्याचे जलपूजन ही कामे गावाच्या विकासाच्या पुढील टप्प्याची सुरुवात असल्याचे त्यांनी नमूद केले.

> आमदार काशिनाथ दाते सरांनी मतदारसंघाच्या विकासाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर गावागावातील मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती दिली आहे. वडझिरे येथे लोकार्पण झालेली रस्त्याची सुविधा, सभामंडप आणि बंधाऱ्याचे काम ही त्याच विकासदृष्टीची उदाहरणे आहेत. 'मागचं सगळं विसरा, पुढे चला' या भूमिकेतून सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा त्यांचा निर्धार निश्चितच स्वागतार्ह आहे. आगामी काळातही शासनाच्या माध्यमातून अधिकाधिक निधी उपलब्ध करून देत वडझिरेसह संपूर्ण मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आमदार दाते सरांच्या नेतृत्वाखाली आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करू.
>
> **–प्रशांत गायकवाड (मा.संचालक जिल्हा बँक अहिल्यानगर)**

# पुणे-अहिल्यानगर रेल्वेमार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

**■ संभाजीनगर-अहिल्यानगर मार्गाच्या सर्वेक्षणालाही मंजुरी**
**■ खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश**

अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड समोर आली असून, पुणे–अहिल्यानगर या १३४ किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गाचा अंतिम स्थान सर्वेक्षण (Final Location Survey-FLS) पूर्ण झाला आहे. तसेच या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (उझ्रठ) तयार करण्यात आला आहे. दुसरीकडे, छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर या ११० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठी FLSला मंजुरी मिळाली आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी खासदार नीलेश लंके यांनी २०२४ पासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यामुळे महत्त्वाचे यश मिळाल्याचे मानले जात आहे.

खासदार म्हणून निवडून आल्यानंतर लंके यांनी अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रश्न सातत्याने केंद्र सरकारच्या पातळीवर लावून धरला. केवळ पत्रव्यवहारापुरता पाठपुरावा न करता लोकसभेच्या सभागृहात अनेकदा या मागणीला वाचा फोडली. तसेच रेल्वे मंत्रालयाशी संबंधित बैठका आणि रेल्वे समितीच्या बैठकींमध्ये सक्रिय सहभाग घेत प्रकल्पांची सद्यस्थिती, सर्वेक्षण, डी पी आर आणि पुढील कार्यवाहीचा आढावा घेतला.

पुणे–अहिल्यानगर रेल्वेमार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण होणे हा प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्याने प्रकल्पाच्या प्रशासकीय व मंजुरी प्रक्रियेला पुढे जाण्यास आवश्यक असलेली दिशा स्पष्ट झाली आहे. या मार्गामुळे अहिल्यानगरला पुणे शहराशी अधिक सक्षम रेल्वे संपर्क मिळण्यास मदत होणार आहे.

त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर ११० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठी अंतिम स्थान सर्वेक्षणाला मंजुरी मिळाल्याने या प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेलाही गती मिळण्याची अपेक्षा आहे. अंतिम स्थान सर्वेक्षणच्या आधारे पुढील टप्प्यात डीपीआर आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

खासदार निलेश लंके म्हणाले, अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रश्न हा केवळ वाहतुकीचा विषय नसून जिल्ह्याच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाशी निगडित आहे. २०२४ मध्ये खासदार झाल्यापासून पुणे–अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर रेल्वेमार्गांसाठी सातत्याने पाठपुरावा करत आहे. लोकसभेत हा विषय अनेक वेळा मांडला तसेच संबंधित बैठका आणि रेल्वे समितीच्या माध्यमातून या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

पुणे–अहिल्यानगर रेल्वेमार्गाचा अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण झाल्याची आणि छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर रेल्वेमार्गाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणला मंजुरी मिळाल्याची माहिती अहिल्यानगरच्या जनतेसाठी समाधानाची बाब आहे. मात्र, हा प्रवास येथे थांबणार नाही. प्रत्यक्ष रेल्वेमार्गाचे काम सुरू होऊन त्याचा लाभ जनतेला मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अहिल्यानगरच्या रेल्वे विकासासाठी इतर महत्त्वाचे प्रकल्पही सुरू आहेत. दौंड–मनमाड २३६ किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण पूर्ण होऊन ते कार्यान्वित झाले आहे. त्यामुळे या मार्गावरील रेल्वे वाहतुकीची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

अहिल्यानगर–बीड–परळी वैजनाथ या २६१ किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गाच्या अहिल्यानगर–बीड–बडवाणी या २०१ किलोमीटरच्या भागाचे काम सुरू असून, प्रकल्पाच्या उर्वरित कामातही प्रगती होत आहे. या प्रकल्पाची किंमत सुमारे ५,८०० कोटी रुपये आहे. याशिवाय धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर या २४० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठीही

अंतिम स्थान सर्वेक्षणला मंजुरी देण्यात आली आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा तसेच राज्यातील प्रमुख शहरांशी अहिल्यानगरची सक्षम रेल्वे जोडणी झाल्यास प्रवासी वाहतुकीसोबतच शेतमाल वाहतूक, व्यापार–उद्योग, रोजगारनिर्मिती



आणि जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

अहिल्यानगरच्या रेल्वे विकासासाठी दिल्लीपासून स्थानिक पातळीपर्यंत प्रत्येक स्तरावर पाठपुरावा सुरू आहे. लोकसभेत आवाज उठविण्यापासून संबंधित समित्या आणि मंत्रालयाच्या बैठकींपर्यंत उपलब्ध प्रत्येक संधीचा उपयोग करून अहिल्यानगरला हक्काची आणि सक्षम रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरूच ठेवणार आहे, असा निर्धार खासदार लंके यांनी व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### कॉर्नेल स्कुल च्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



जुन्नर (समर्थ गांवकरी)

गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्यमैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था, यांच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यातील कॉर्नेल मेमोरियल स्कूल,येथील गरीब गरजू विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले.शाळेने केलेल्या मागणी नुसार संस्थेने विद्यार्थ्यांसाठी गणवेश उपलब्ध करून दिले.

या उपक्रमातून गरजू निरागस विद्यार्थ्यांना शैक्षणिकप्रवासात प्रोत्साहन मिळावे,हा संस्थेचा उद्देश आहे.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक लबडे सर, शिक्षकवृंद,विद्यार्थी व पालक उपस्थित होते.तसेच मैत्रीहेल्थ केअर सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब पोखरकर,सचिव गौरीताई पोखरकर,उपसमितीकार्याध्यक्ष सुषमाताई थोरात,जुन्नर तालुका जनसंपर्क अधिकारी सुप्रिया शेळके,जुन्नर शहर प्रमुख संध्याताई ताजणे, मुख्य कार्यकारी अधिकारी हेमंत वाळूज ,जुन्नर तालुका अध्यक्ष उमेश हापसे आणि विभाग प्रमुख प्रतीक मोरे यांची उपस्थिती होती.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब पोखरकर यांनी शाळेची व विद्यार्थ्यांची माहिती जाणून घेतली भविष्यातही विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींमध्ये शक्य त्या माध्यमातून मदत करण्यासाठी मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था प्रयत्नशील राहील,असे आश्वासन त्यांनी दिले.या सामाजिक उपक्रमाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापक शिक्षकवृंद,पालकां,विद्यार्थ्यांनी मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्थेचे मनःपूर्वक आभार व धन्यवाद व्यक्त केले. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी.मानून कार्यक्रम सांगता करण्यात आली.

### जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त बागडपट्टीत आर्ट प्रशिक्षण

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवात बागडपट्टीत जिव्हेश्वर भवन येथे काल दि. १८ ऑगस्टला दुपारी ४ वा सर्वासाठी खुला मोफत नेलं आर्ट प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे. आजच्या जमान्यात महिला व युवतीचा कल स्मार्ट दिसण्याकडे असतो त्यामध्ये आपले नख सुंदर व आकर्षक दिसण्यासाठी त्याचा प्रयत्न असतो नेल एक्स्टेन्शन मुळे त्याचे व्यक्तिमत्व खुलून दिसण्यासाठी मदत होते जेल नेल्स,ऍक्रिलिक नेलं,पॉली नेल्सची माहिती व्हावी यासाठी हा क्लास आयोजित करण्यात आला आहे यामध्ये नेलं क्रिएशन च्या अनुजा कांबळे या प्रशिक्षण देणार आहे.



### आयोजित संभाजीनगर ते पुणे ग्रीन फील्ड ला पाथर्डी येथे इंटरचेंज द्या : अविनाश पालवे

पाथर्डी (समर्थ गांवकरी)

नियोजित पुणे ते संभाजीनगर ग्रीनफीड महामार्ग पाथर्डी शहराच्या जवळून जाणार असून सध्याच्या आराखड्यात पाथर्डी येथे इंटरचेंज दिसत नाही तरी या महामार्गाला पाथर्डी येथे इंटरचेंज (चढणे उतरणे) द्यावा अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित यांच्याकडे केली आहे



पालवे यांनी म्हटले आहे की, नियोजित संभाजीनगर ते पुणे सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग हा पाथर्डी येथून जात असून या महामार्गामुळे कायम दुष्काळी व ऊसतोड मजुरांचा तालुका अशी ओळख बनलेला आमचा पाथर्डी तालुका देशाशी जोडला जाईल पुणे, संभाजीनगर, मुंबई, नागपूर, दिल्ली, बंगळुरू, हैदराबाद यांसारख्या मोठ्या शहरांची बाजारपेठ स्थानिक नागरिक व व्यावसायिक यांना थेट खुली होईल परंतु आपल्या विभागाकडून करण्यात आलेल्या अंतिम आराखड्यामध्ये पाथर्डी ला इंटरचेंज दिलेला नाही हा महामार्ग खूप महत्त्वाचा असून इंटरचेंज नसल्याने पाथर्डीतील जनतेची घोर निराशा होऊन हा भाग कायम दुष्काळीच राहील व येथील नागरिक तरुण व व्यावसायिकांना देशाची बाजारपेठ उपलब्ध होणार नाही तरी हा महामार्ग पाथर्डी अहिल्यानगर रस्त्याला निवडुंगे येथे व पाथर्डी शेवगाव रस्त्याला डांगेवाडी येथे क्रॉस होत असून दोन्हीपैकी एका ठिकाणी पाथर्डीकरांसाठी इंटरचेंज (चढणे उतरणे) द्यावा व पाथर्डी तालुक्याला या महामार्गाने देशाशी जोडावे अशी मागणी अविनाश पालवे यांनी केली आहे

# अगस्ती साखर कारखान्याच्या वार्षिक सभेत का. दादासाहेब रूपवते यांच्या योगदानाचे स्मरण!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील एकमेव औद्योगिक प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत का. दादासाहेब रूपवते यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. कारखान्याच्या उभारणीसाठी का. दादासाहेब रूपवते तसेच त्यांच्या समकालीन सहकाऱ्यांनी घेतलेल्या कष्टांची आठवण करून देत त्यांच्या कार्याचा विसर पडू नये, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर का. दादासाहेब रूपवते यांचे छायाचित्र व निवेदन कारखान्याच्या समस्त संचालक मंडळाकडे सुपूर्द करण्यात आले.

अगस्ती साखर कारखाना उभारण्यासाठी तत्कालीन काळात अनेक कार्यकर्ते, शेतकरी आणि सहकाऱ्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या अथक परिश्रमातून तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक व औद्योगिक विकासाची नवी दिशा देणारा हा प्रकल्प उभा राहिला. त्यामुळे कारखान्याच्या इतिहासात योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांच्या कार्याची आठवण जपणे ही सर्वांचीच जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. का. दादासाहेब रूपवते यांचे योगदान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावे आणि कारखान्याच्या वाटचालीत त्यांच्या कार्याचे योग्य स्मरण व्हावे, या उद्देशाने हे छायाचित्र व निवेदन संचालक मंडळाकडे देण्यात आले.

यावेळी कारखान्याचे अध्यक्ष सिताराम पाटील गायकर यांनी समाजाच्या भावना लक्षात घेऊन आगामी काळात आवश्यक त्या सुधारणा करण्याचे आश्वासन दिले. कारखान्याचे कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. आमदार डॉ. किरण लहामटे, कारखान्याच्या उपाध्यक्ष सुनीताताई भांगरे, संचालक मंडळातील सदस्य, व्यवस्थापकीय अधिकारी–कर्मचारी तसेच कारखान्याचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, अगस्ती सहकारी साखर कारखान्यासमोर सध्या विविध अडचणी आणि आव्हाने उभी आहेत. या प्रश्नांवर केवळ राजकीय पातळीवर चर्चा न करता शासन दरबारी एकत्रितपणे पाठपुरावा करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कारखाना, शेतकरी आणि सभासदांच्या हितासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तालुक्याच्या विकासासाठी तसेच कारखान्याच्या भविष्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वजण एकत्र उभे राहतील, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.



अगस्ती साखर कारखाना हा अकोले तालुक्यातील शेतकरी आणि कामगारांच्या दृष्टीने महत्त्वाचा औद्योगिक आधार आहे. त्यामुळे कारखान्याची आर्थिक व प्रशासकीय घडी मजबूत करण्यासोबतच त्याच्या उभारणीत योगदान देणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींच्या कार्याचा सन्मान राखणे आवश्यक आहे. आगामी काळात कारखान्याच्या अडचणी दूर करून तो अधिक सक्षमपणे उभा राहावा, यासाठी संचालक मंडळ, सभासद, शेतकरी आणि तालुक्यातील सर्व राजकीय व सामाजिक घटकांनी एकत्रित प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## 'वारुळाचा मारुती' मंदिरात पचंबा यात्रोत्सवास महापुजेने सुरुवात

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



सीना नदीतीरावर असलेल्या प्रसिद्ध 'वारुळाचा मारुती' मंदिरात पचंबा यात्रोत्सवास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

सकाळी ७ वाजता वृक्ष प्राधिकरण समितीचे मा सदस्य पत्रकार महेश कांबळे, नगरसेवक महेश लोंढे, देशमुख साहेब, रोहित मुजमुले व भाऊसाहेब गुंजाळ यांच्या हस्ते अभिषेक व महापूजा करण्यात आली. यावेळी पै संभाजी लोंढे, सिध्दनाथ मेटे महाराज , बाळासाहेब वाघ,पै मनोज लोंढे, श्री गायके,तोफखाना पोलीस ठाण्याचे अनिल चव्हाण, आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. त्यानंतर दरवर्षी प्रमाणे नवीन धर्मध्वज पूजन नगरसेविका सौ. वैशाली नळकांडे,नगरसेवक श्याप आप्पा नळकांडे, संदीप दातरंगे यांच्या हस्ते करण्यात येऊन यात्रोत्सवाची विधिवत सुरुवात करण्यात आली. मयुर जोशी व प्रदीप जोशी यांनी पौराणिक विधी पार पाडले.

पचंबा यात्रोत्सवाला शेकडो वर्षांची परंपरा असल्याचे जाणकार सांगतात. यात्रेनिमित्त सकाळपासूनच वारुळाचा मारुतीच्या दर्शनासाठी शहरासह विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. सायंकाळच्या सुमारास भाविकांची अफाट गर्दी असते यात्रोत्सवानिमित्त अर्पण ब्लड बँकेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तीन पिढ्यांना जोडणारा पोदार प्रेपचा स्वातंत्र्यदिन सोहळा!

### तीन पिढ्या, एक तिरंगा अन् स्वातंत्र्याच्या आठवणी; पोदार प्रेपमध्ये भावनिक सोहळा!

संगमनेर (समर्थ गांवकरी)



आठवणी आजी–आजोबांच्या, अनुभव पालकांचे, स्वप्ने चिमुकल्यांची आणि अभिमान तिरंग्याचा! या भावनेतून पोदार प्रेप, संगमनेर येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. तीन पिढ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात देशप्रेम, संस्कार आणि जुन्या आठवणींचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

या कार्यक्रमास उपमुख्याध्यापक योगेश आवारी, प्रशासकीय अधिकारी सागर नेरपगार, कार्यक्रम समन्वयक पंकज कुटे आणि मुख्याध्यापिका मयुरा निजामपुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी पालक तसेच आजी–आजोबांनी त्यांच्या काळातील स्वातंत्र्यदिनाच्या आठवणी, अनुभव आणि देशभक्तीच्या भावना चिमुकल्यांसोबत शेअर केल्या.

मुख्याध्यापिका मयुरा निजामपुरकर यांनी स्वातंत्र्याची किंमत, तीन पिढ्यांमधील संवाद आणि बालवयातच मुलांच्या मनात मातृभूमीविषयी प्रेम व अभिमान निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विविध मनोरंजक व अनुभवाधारित उपक्रमांमध्ये पालक, आजी–आजोबा आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी पोदारचा लाडका मॅस्कॉट जम्बोच्या आगमनाने चिमुकल्यांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. तीन पिढ्यांना जोडणारा आणि संस्कार व देशप्रेमाची नवी पेरणी करणारा हा स्वातंत्र्यदिन सोहळा अविस्मरणीय ठरला.

## विद्या निकेतन ग्लोबल इन्स्टिट्यूटमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त फार्मा मॉडेल मेकिंग स्पर्धा उत्साहात संपन्न

बोटा (समर्थ गांवकरी)

विद्या निकेतन ग्लोबल इन्स्टिट्यूटमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्या निकेतन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, बोटा यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, वैज्ञानिक दृष्टिकोनाला व तांत्रिक कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी फार्मा मॉडेल मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी फार्मसी व औषधनिर्माणशास्त्राशी संबंधित विविध विषयांवर आकर्षक, नाविन्यपूर्ण व माहितीपूर्ण मॉडेल्स सादर करून आपल्या कल्पकतेचे आणि वैज्ञानिक ज्ञानाचे प्रभावी दर्शन घडविले.

पदवी विभागात अंबेकर निकिता, नान्नर शुभांगी आणि कान्होरे जिज्ञासा यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. तर डिप्लोमा विभागात घुले रोहन, कुटे स्वामी आणि नागरे सुजित यांनी उत्कृष्ट मॉडेल्स सादर करून यश संपादन केले.

या स्पर्धेसाठी संस्थेच्या CEO डॉ. विधुलता पाटील मॅडम, dvisor डॉ. बी. जी. शेखर पाटील सर तसेच सर्व विभागांचे प्राचार्य उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या मॉडेल्सचे कौतुक करून त्यांच्या सर्जनशीलतेला व वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन दिले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिंदे के. के. यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक विभागाच्या नियोजनातून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.

## नाणेघाट,दाऱ्याघाटाकडे पर्यटकांची पावले.(सुरक्षेच्या उपाययोजनांची अंमल बजावणी करण्याची आवश्यकता)

जुन्नर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात सध्या निसर्गाची मुक्तहस्ते उधळण सुरू आहे.हे निसर्ग

आणि निसर्गाचे विहिंगम सौंदर्य अनुभवण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक गर्दी करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पश्चिम आदिवासी भागातील नाणेघाट, तसेच दाऱ्याघाट परिसर निसर्ग सौंदर्य बहरल्याने पर्यटकांची येथे गर्दी होत आहे.पर्यटकां साठी सुरक्षेच्या उपाययोजनां ची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. दरवर्षी पावसाळ्यामध्ये जुन्नर तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील नाणेघाट,दाऱ्याघाट,आंबे, हातवीज,चावंड,हडसर व जीवधन किल्ला,या पर्यटन स्थळांना पर्यटकांची नेहमीच पसंती असते.ज्यातील पुणे, अहिल्यानगर,ठाणे,मुंबई या परिसरातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक पर्यटनासाठी येत आहेत.

डोंगररांगांवरून फेसळणारे धबधबे,हीरवाईने नटलेली सह्याद्रीची पर्वतरांग त्यावर येणारे दाट धुके,हिरवीगार भात खाचरे पर्यटकांना आकर्षित करत आहेत.तर नाणेघाट येथील रिव्हर्स फॉल

(उरफटा धबधबा),नानाचा अंगठा या ठिकाणी गर्दीचे प्रमाण अधिक आहे तर दाऱ्याघाट व आंबे हातवीज येथील कांचन धबधब्याखाली मनमुराद भिजण्याचा आनंद पर्यटकांकडून घेतला जात आहे. तर ट्रेकर्स मंडळी चावंड

हडसर,जीवधन, दुर्गाबाई व वरसुबाई किल्लयावर जात आहेत दरम्यान,जुन्नरच्या पर्यटन विकासासाठी आदिवासी भागामध्ये मूलभूत व पायाभूत सुविधांची निर्मिती होणे आवश्यक आहे.



> पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांनी प्रशासनाने निर्देशित केलेल्या उपाय योजनांची अंमलबजावणी करावी. पर्यटनस्थळांवर कोणत्याही प्रकारे निसर्गाची हानी होणार नाही याची काळजी घ्यावी.अन्यथा पर्यावरणास नुकसान करणाऱ्या व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.
>
> **: –– प्रदीप चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर:**

# ज्ञानसंपदा शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

ज्ञानसंपदा शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी तसेच प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एमआयडीसी अहिल्यानगर चे डॉ. गणेश राठोड आवर्जून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत ध्वजगीत व महाराष्ट्र गीत गायन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन सादर केले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर यांनी करून दिला. तर सत्कार संस्थेचे अध्यक्ष श्री प्रवीणजी बजाज यांनी केला.

त्यानंतर इयत्ता दुसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक कवायतीचे सादरीकरण केले. शाळेच्या गायक वृंदांनी संस्कृतमध्ये देशभक्तीपर समूहगीताचे सादरीकरण केले. स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व भारताची विविध क्षेत्रातील झेप याविषयी आपले मनोगत शाळेच्या विद्यार्थिनी कुमारी सायली गिरी व उजमा पठाण यांनी मराठी व इंग्रजी भाषेत व्यक्त केले.

शैक्षणिक वर्ष२०२५–२६ च्या एस. एस. सी. च्या परीक्षेतील तसेच शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

ज्ञानसंपदा शाळेचे नियतकालिक ज्ञानटाइम्स च्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे मानद सचिव श्री अरुणजी कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देशाची जडणघडण करण्याचे मुख्य काम शैक्षणिक संस्था करत आहेत. तसेच ज्ञानसंपदा शाळेच्या कामकाजाचा आढावा घेत शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शुभारंभ करताना गुरु शिष्य परंपरेवर शोभा यात्रेचे भव्य यशस्वी आयोजन शाळेने केले तसेच ज्ञानसंपदा शाळा शिक्षक प्रशिक्षण केंद्र म्हणून नावारूपाला आणण्याचा मानस व्यक्त केला.

तसेच शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्ताने शाळेमध्ये शिक्षण परिषदेचे, माजी विद्यार्थी संघ,वृक्षारोपण भव्य मॅरेथॉन यांचेआयोजन करणार असल्याचे जाहीर केले.

नंतर प्रमुख पाहुणे श्री गणेश राठोड यांनी मार्गदर्शनपर आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले विद्यार्थ्यांनी लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टींपासून दूर राहिले पाहिजे तसेच शिक्षकांचा आदर केला पाहिजे. नेहमी शिस्तीचा अवलंब केला पाहिजे, मुलांनी शालेय जीवनात स्वतःमध्ये नेतृत्व गुण, जिज्ञासा, मेहनत सातत्य या गुणांचा विकास करणे आवश्यक आहे. असा जीवनाचा मूलमंत्र दिला.



विविध क्षेत्रात काम करत असताना डॉक्टर राठोड यांना विविध प्रकारच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्रामध्ये पहिला सातबारा उतारा संगणकीकृत करण्याचा मान देखील राठोड सरांना मिळतो. तसेच लोकसभा निवडणुकीतील व्ही व्ही पॅट मशीनचा प्रयोग नाशिक येथे २०१५ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांनी यशस्वी करून दाखवला.. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुणजी कुलकर्णी, स्कूल कमिटी चेअरमन श्री कारभारी भिंगारे, खजिनदार श्री. अविनाशजी बोपर्डीकर श्रीहरी टिपूगडे, विनोद बजाज, श्री.सुमित सोनवणे, श्री.विनोद बजाज, सुहास मुळे, दिनेश अग्रवाल, वरूण भगत, लताताई भगत, सौ. सरिता बजाज, सौ.मिलन गंधे, आशाताई सोनवणे, अक्षय वाघमोडे, राहुल बजाज, अमित सोनवणे, रोहन बजाज, सुहास भिंगारे, गौरव गंधे, गौतम गंधे अमेय कुलकर्णी, अनिरुद्ध बोपर्डीकर, प्रितेश बजाज, निनाद टिपुगडे, डायरेक्टर डॉ. सुनिता भागवत परिवारासह उपस्थित होते. पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते,तसेच माजी विद्यार्थी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर यांच्या उत्तम मार्गदर्शनाने आणि तसेच श्री प्रसाद बर्वे यांच्या नियोजनाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. तसेच ज्ञानसंपदा शाळेचे सर्व उपक्रमशील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.